# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
## कल्पतरु पॉईंट, सायन (पूर्व),
## मुंबई-४०० ०२२

## जाहीर सूचना

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्गमित केलेल्या स्थायी आदेश क्र.बीओ/पीॲण्डएल डिव्हीजन/ब-११९, दिनांक ६/१/२०१० च्या अंमलबजावणीबाबत**

लक्षवेध-जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ च्या कलम २५/२६ कलमांतर्गत व हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ च्या कलम २१ अंतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र न घेता चालू असलेले कारखाने, प्रवर्तने व प्रक्रिया यांचेबाबत

-------------

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या असे लक्षात आले आहे की जे कारखाने, प्रवर्तने व प्रक्रिया मंडळाचे संमतीपत्र घेण्यास विलंब करीत आहेत, असे कारखाने, प्रवर्तने व प्रक्रिया यांना व्यपगत कालावधीतील संमतीपत्राचे शुल्क आकारुन / संमतीपत्र विलंब शुल्क आकारुन सुध्दा, हे कारखाने मंडळाचे कारखाना उभारणीसाठीचे आणि चालविण्यासाठीचे संमतीपत्र न घेता बरीच वर्षे कार्यरत आहेत. त्यामुळे, असे कारखाने, प्रवर्तने व प्रक्रिया प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा न बसविता, वातावरणामध्ये प्रदूषके सोडत असल्यामुळे, पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ च्या नियमांचे व मानकांचे उल्लंघन करीत असून सभोवतालचे वातावण प्रदुषित करीत आहेत. सदर बाबतीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक १४/९/२०१० रोजी झालेल्या १५ व्या संमतीपत्र समितीच्या बैठकीत अशा अनधिकृत कारखान्यांमुळे होणा-या सलग अनुपालनाबाबत सविस्तर चर्चा झाली आणि चर्चेअंती असे सुचविण्यात आले की, असे कारखाने, प्रवर्तने आणि प्रक्रिया जे मंडळाचे संमतीपत्र न घेता, ज्या कालावधीसाठी कार्यरत आहेत, त्या कालावधीसाठी त्यांच्यावर संमतीपत्र शुल्काच्या १० पट इतका दंड आकारण्यात यावा.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक १/१०/२०१० रोजी झालेल्या १५१ व्या बैठकीसमारे सदरहू बाब ठेवण्यात आली होती आणि सर्वानुमते संमतीपत्र शुल्काच्या १० पट दंड आकारण्याबाबत ठराव संमत झाला, जेणेकरुन, प्रदीर्घ कालावधीसाठी संमतीपत्र घेण्यासाठी विलंब करणारे अथवा न घेणारे कारखाने, प्रवर्तने व प्रक्रिया परावृत्त होतील, जेणेकरुन सदर कारखाने संमतीपत्रासाठी विहित वेळेत मप्रनि मंडळाकडे संमतीपत्र शुल्कासहीत अर्ज करतील. तसेच असेही ठरविण्यात आले की, संमतीपत्र शुल्काच्या १० पट दंड आकारण्याबाबतची योजना राबविण्याआधी अशा कारखान्यांना मप्रनि मंडळाकडे संमतीपत्र शुल्कासहीत अर्ज करण्यासाठी ४ माहिन्यांचा कालावधी देण्यात यावा आणि सदर कालावधी संपल्यानंतर, असे कारखाने, प्रवर्तने व प्रकिया यांच्यावर संमतीपत्र शुल्काच्या १० पट दंड आकारण्यात यावा व तद्नंतर, त्यांच्याविरुध्द खटले दाखल करणे आणि योग्य ते बंदचे आणि वीज व पाणी पुरवठा खंडीत करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व प्रादेशिक अधिका-यांना असे निर्देश देण्यात आलेले आहेत की, मप्रनि मंडळाचे संमतीपत्र न घेता कार्यरत असलेले कारखाने, प्रवर्तने व प्रक्रिया यांना संमतीपत्रासाठी अर्ज करण्यासाठी समज देण्यात येऊन, त्यांना अर्ज करण्यासाठी दिनांक १८/२/२०११ पर्यंत कालावधी देण्यात यावा. तरीदेखील पूर्तता न केल्यास, मप्रनि मंडळ संमतीपत्र शुल्काच्या १० पट दंड आकारेल, जेणेकरुन, प्रदीर्घ कालावधीसाठी संमतीपत्र घेण्यासाठी विलंब करणारे अथवा न घेणारे कारखाने, प्रवर्तने व प्रक्रिया परावृत्त होतील, जेणेकरुन सदर कारखाने संमतीपत्रसाठी विहित वेळेत मप्रनि मंडळाकडे संमतीपत्र शुल्कासहीत अर्ज करतील अन्यथा तद्नंतर, त्यांच्याविरुध्द खटले दाखल करणे आणि योग्य ते बंदचे आणि वीज व पाणी पुरवठा खंडीत करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्याबाबत मंडळाच्या सर्व प्रादेशिक अधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १/४/२०११ या नवीन आर्थिक वर्षा पासून सदरचा दंड आकारण्याचे ठरविले आहे. त्याअर्थी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र न घेतलेले कारखाने, प्रवर्तने व प्रक्रिया यांच्या निदर्शनास असे आणून देण्यात येत आहे की, ज्यांनी मप्रनि मंडळाकडे संमतीपत्र आणि प्राधिकारपत्रासाठी अर्ज केला नसेल, त्यांनी मप्रनि मंडळाच्या दिनांक १/१०/२०१० रोजी झालेल्या १५१ बैठकीतील वर नमूद केलेल्या ठरावाची पूर्तता करावी, जेणेकरुन, जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ च्या कलम २५/२६ व हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ च्या कलम २१ या तरतुदींची पूर्तता होईल. याबाबत मप्रनि मंडळाने, मंडळाच्या सर्व विभागप्रमुख, प्रादेशिक अधिकारी यांना योग्य तो पाठपुरावा करण्यबाबत स्थायी आदेश निर्गमित केलेले आहेत व सदर स्थायी आदेश मप्रनि मंडळाच्या संकेतस्थळावर (http://mpcb.gov.in) ठेवण्यात आलेले आहेत.

( राधेश्याम मोपलवार )
सदस्य सचिव

दिनांक : /१/२०११